# लहरी सतसंग श्लोकावली



## संत जैरामदास कृत मनाचे श्लोक

किमत- २-५०

॥ ॐ नमो गुरु श्रीलहरये ॥



## अथ ध्यानं

धर्मानंदं परमसुखदं कामठाक्षेत्रवासं
नित्यानंदं सच्चित्‌घनं आत्मबोधसमुद्रं
लोकोद्धारं सततभ्रमणं कर्मयोगी समर्थं
वन्दे संतं परमहंसं सद्‌गुरुं श्रीलहरये ॥

# स्तोत्रं

नमो ! धर्मपुत्रा ! पवित्रा ! सुमित्रा ! ।
कलासृष्टो धात्रा ! कामठाग्राम क्षेत्रा ।
अगा ! दिव्यनेत्रा ! भक्तहृदयीं निवासा ।
नमामि गुरू संत जयरामनाथा ॥ १ ॥

अगा ! चक्रधारी ! अघारि ! तपारि !
परोपकारी अन् भवदु:खहारी ।
कल्पद्रुमा कामधेनु तू जैसा ।
नमामि गुरू संत जयरामनाथा ॥ २ ॥

गोसंवर्धना ! अन् कृषीप्रधाना ।
क्षतीपावना ! कर्मयोगप्रधाना ।
अगा भाविकांच्या मार्गदर्शक दिनेशा ।
नमामि गुरू संत जयरामनाथा ॥ ३ ॥

अकारा उकारा मकारा अर्धबिंदु :
कृपादृष्टीधारा वर्षवी दीनबंधू ।
अगा ब्रम्हसूत्रा आत्मबोधप्रकाशा ।
नमामि गुरू संत जयरामनाथा ॥ ४ ॥

स्वर, तत्व बोधा । अगाधा । सुमेधा ।
अज्ञजनांची काढ़ी भवभूतबाधा ।
करी पूर्ण जिज्ञासुंचि ज्ञानपिपासा ।
नमामि गुरू संत जयरामनाथा ॥ ५ ॥

भजनादि द्वारे लोक जागृत केले ।
दयाप्रेमभावे लोकहि संग्रहिले ।
सुखशांती लोका दे करिसी प्रयासा ।
नमामि गुरू संत जयरामनाथा ॥ ६ ॥

किती नास्तिका भक्तिमार्गात नेले ।
व्यसनादिग्रस्ता विषयमुक्त केले ।
धनी निर्धना पाहसी एक जैसा ।
नमामि गुरू संत जयरामनाथा ॥ ७ ॥

अगा ! स्मरणमात्रे धावुनि ये सदैवा ।
अगा ! प्रगट होशी काळ स्थळ ना अपेक्षा ।
चराचरामधीं सदा वास तुझा ।
नमामि गुरु संत जयरामनाथा ॥ ८ ॥

गोपाळ लक्ष्मण घोमने

॥ श्री गुरुदेवाय नमः ॥

जरी ईश्वरें वेद निर्माण केलें
परी काळओघे काळग्राह्य जहाले
जगी जन्म घयी ईश्वरी देवदूत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ १ ॥

अगा कर्मकांडात स्वारस्य नाही
अता यज्ञयागांत मुळी अर्थ नाही
मनाला नको वाटु देशील खंत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत । २ ॥

त्रिगुणात्मके वेद हे सर्व असती
मना मानसा कामना पूर्ण करीति
सकाम कर्म योगे मिळेना अनंत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ ३ ॥

मना संत निष्काम गुणातीत असती
स्वयं ज्ञान योगें जगा बोध देती
नसे मार्ग ह्या सारिखा मूर्तीमंत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत । ४ ॥

ब्रह्माच्या मूखांतूनी चतुर्वेद झाले
परी संतवाणीतूनी शास्त्र झाले
नितनित्यशुद्ध वच हे बनतात ग्रंथ
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ ५ ॥

मना वेद भेदा असे ठाव संता
परी संत भेदा नसे ठाव वेदा
अरे संतवाणी वेद ना जाणी अंत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ ६ ॥

मृताची म्हणें दशक्रिया महंत
स्वतःची क्रिया वेदीया ठाव नाही
जीवंतपणी करी दशक्रिया महंत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ ७ ॥

अस्पृश्य स्पृश्य भाव नसे जिवाला
आम्ही स्वार्थतेने भेद निर्माण केला
माती असे तोंवरी जाती जगांत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ ८ ॥

अरे संत शब्दात किती एक भेद
नसे जाणती शारदा शेष वेद
ह्यांचा न लागे कुणालाही अंत
म्हणें दास जैराम पांचवा वेद संत ॥ ९ ॥

अगा पुस्तकी ज्ञान असते उधारी
जना ज्ञान सांगे असे तो भुसारीं
हुशारी तयाची पाडते नित्य भ्रांत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ १० ॥

म्हणावे तुम्हीं संतसाधु कुणाला
स्वयंचेच जो ज्ञान देतो जगाला
जयाचेनि ज्ञाने शांत होतो अशांत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ ११ ॥

अरे वेदशास्त्रें वाचूनि ज्ञान होते
परीं ज्ञानयोगे कागदी मूर्ती दिसते
अगा संत दावी प्रत्यक्ष भगवंत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ १२ ॥

नको वेद वाचू नको शास्त्र वाचू
नको योग साधू नको माळ साधू
परी घेई हा एवढा संतपंथ
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ १३ ॥

यज्ञक्रियेने स्वर्ग सुखभोग घेशी
पुरूषोत्तमाला विसरूनीं जाशीं
अरे आत्मसुख दे शाश्वत नित्य सत्य
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ १४ ॥

वेदत्रयेचे पठन करोनीं
धनी काय ती दाविते वेदवाणी
धनी ह्या जगाचा दावे जो भाग्यवंत
म्हणें नाथ जैराम पांचवा वेद संत ॥ १५ ॥

मना संत हे देव अवनींतलांचे
जयाचे कृपे रोग पळती भवाचे
समदृष्टीने पाहती सर्व जीवा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ १६ ॥

मिळाला तुला जन्म हा मानवाचा
नको आचरूं मार्गसा दानवाचा
जरीं वाटते जन्म हा सार्थ व्हावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ १७ ॥

असे रे रतन जन्म हें मानवाचे
करीं रे जतन अस्त्र हे ईश्वराचे
करोनी सुकर्मे पुण्य संचय करावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ १८ ॥

मना मृत्यूभूमीं असे कर्मभूमी
मना स्वर्गभूमीं असे भोगभूमी
त्यजीं भोग तू कर्मयोगी बनावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ १९ ॥

विनाकारणे भार वाहसो भवाचा
विनाकारणे त्रास घेसी जिवाचा
मना ईश्वरा भार सोडूनी द्यावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ २० ॥

अरे अन्न खाऊनीं तू मातलासी
परी आत्मदेवा भूका ठेवलासी
भजन भोजनाने तृप्त करावा
म्हणें नाथ जैरांम सत्संग करावा ॥ २१ ॥

मना राष्ट्रपतीं ह्या म्हणती जिवाला
मना छत्रपती ह्या म्हणतीं देहाला
स्वत:स काय म्हणतीं नसे त्यास ठावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ २२ ॥

यमाच्या घरीं तुझी होईल पेशीं
स्वयं सोडविण्या कुणा हाक देशी
तया संतवकीला म्हणा सोडवावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ २३ ॥

असो रंक राजा अडाणीं सुजाणीं
दरिद्री धनी श्रेष्ठ वा नीच प्राणीं
दया तो करीं सारखी सर्व जींवा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ २४ ॥

नको रे करू द्वेष कोण्या जिवाचा
प्रभू नाम संकीर्तनी शुद्ध वाचा
जयाचेनी लाभे चिदानंद ठेवा
म्हणे नाथ जैराम सत्संग करावा ॥ २५ ॥

मना स्थीर होशी प्रभूच्या रुपाशी
मिळे सच्चीदानंद कैवल्य राशी
वैराग्य योगे अभ्यास करावा
म्हणे नाथ जैराम सत्संग करावा ॥ २६ ॥

जे जे करीशीं ईश्वरार्पण करावे
मना कर्मबंधातूनी मुक्त व्हावे
अहंकार जाता चिरशांति पावा
म्हणे नाथ जैराम सत्संग करावा ॥ २७ ॥

तुझी बुद्धी रे छिन्न विछिन्न आहे
परी संत बुद्धी अरे एक आहे
मना बुद्धीयोगे प्रभु आकळावा
म्हणे नाथ जैराम सत्संग करावा ॥ २८ ॥

कितीं वाचशी ग्रंथ पोथ्या पुराणें
किती लावशी अर्थ अपूल्या मनाने
मना वादविवाद सोडूनी द्यावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ २९ ॥

धरी रे मना पाय संत माऊलीचे
कसे वर्णवू तूज तिच्या लिलाचे
कृपापात्र होऊनी मिळवी तू ठेवा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ ३० ॥

असे कर्म खोटे म्हणे दैव खोटा
असे निती खोटी दैव आहे करंटा
अरे ! तूच खोटा हा मंत्र पुसावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ ३१ ॥

मना कामना वासना विषयांच्या
मना मूळ आशा निराशा जिवाच्या
अरे ! वाटते जीव हा सार्थ व्हावा
म्हणें नाथ जैराम सत्संग करावा ॥ ३२ ॥

नको जाऊरे काशीं विश्वेश्वराशी
नको जाऊ रे सेतु रामेश्वराशी
जरी की हवा क्षेत्र पुण्य प्रभावा
म्हणे नाथ जैराम सत्संग करावा ॥ ३३ ॥

कशाला करी स्नान भागीरथीत
कशाला उडी घाली गोदावरीत
मनोधूल रज तो धुवूनि निघावा
म्हणे नाथ जैराम सत्संग करावा ॥ ४ ॥

किती चोपडी साबू अपुल्या शरीरा
किती सिंचशी अत्तराचा फबारा
मनोगंध दुर्गंध घुसळोनी जावा
म्हणे नाथ जैराम सत्संग करावा ॥ ३५ ॥

चन्दनापरी देह झिजवीत जावे
तीथेच आपले स्वहीत पहावे
कुण्याहि जिवाचा भेदभाव नसावा
म्हणे नाथ जैराम सत्संग करावा ॥ ३६ ॥

कुणी त्रास घेती डिग्री संप्रदनार्थ
अरे ! डिग्री हीं पोट संरक्षणार्थ
मना आत्म डिग्रीने, स्वानूभवावा
म्हणे नाथ जैराम प्रभू आळवावा ॥ ३७ ॥

म्हणे देव जाणे तयाची लिलाहीं
कुठे राहतो, चालतो बोलतोही
जो सर्व जाणे तया जाण बाबा
म्हणे नाथ जैराम प्रभू आळवावा ॥ ३८ ॥

जेणे व्यापिला सर्व ब्रम्हांड सारा
दिसे तीन भुवनी जयाचा पसारा
अरे चर्मचक्षुनी कैसा दिसावा
म्हणे नाथ जैराम प्रभू आळवावा ॥ ३९ ॥

धरी लालसा तू किती एक पदाची
अरे मानसा ! खाई ही आपदाची
दुःखामागूनी दुःख येतात सारी
म्हणोनी स्मरा एक तो चक्रधारी ॥ ४० ॥

कुणा वाटते होईं मी मुख्यमंत्री
कुणा वाटते होईं मीं मुख्ययंत्री
अरे जंत्र हे वाटते दुःखकारो
म्हणोनि स्मरा एक तो चक्रधारी ॥ ४१ ॥

अरे ! कर्म केल्याविना कोण आहे
अरे ! कर्मविना कसे पोट भरावे
परी कर्मबंधातूनी मुक्त व्हासे
मना कर्म निष्काम भावे करावे ॥ ४२ ॥

फलप्राप्तीचा रे ! तुझा हक्क आहे
परी कर्म करणे तुझा हक्क आहे
न तू कर्म करणार नाही म्हणावे
मना कर्म निष्काम भावे करावे ॥ ४३ ॥

अनासक्त राहूनी रे कर्म करशी
मिळे कर्मफल ते प्रभूला वहाशी
जन्म मृत्यू बंधातूनी रे सुटावे
मना ! कर्म निष्काम भावे करावे ॥ ४४ ॥

शुभाशुभ फल ते कसेही असूं दे
प्रभूच्या पदी ते समर्पित असूं दे
अरे तोच कर्ता नी भोक्ता वदावे
मना कर्म निष्काम भावे करावे ॥ ४५ ॥

कर्मेंद्रियांना जरी आवरीशीं
मनी ध्यान ते विषयाचे करिशी
अरे ! दांभिकाला धुळी मिळवावे
मना कर्म निष्काम भावे करावे ॥ ४६ ॥

अरे ! शत्रूता मित्रता एक पाहे
तथा मान अपमान सुखदुःख साहे
निंदा स्तूती द्वंद्व विरहीत व्हावे
मना कर्म निष्काम भावे करावे ॥ ४७ ॥

करु रे नको तू अपेक्षा कुणाची
मनोवृत्ती बानी उदासीनतेची
सुचिर्भूत राही अनासक्त व्हावे
मना कर्म निष्काम भावे करावे ॥ ४८ ॥

करी दृढ़ संकल्प हरीं किर्तनाच्या
मुखी नाम घेता तया पूढ़ती नाचा
मींरा नाचलीं वाटलीं नाही शर्म
अनन्यत्व हें जाणिजे भक्तीवर्म ॥ ४९ ॥

उपासना तू करी ईश्वराची
परी वासना ठेवितो तू पूढ़ेची
अरे आड येतो वासनेचा कुकर्म
अनन्यत्व हे जाणिजे भक्तीवर्म ॥ ५० ॥

असे तोच माता पिता तोच भ्राता
कर्ता करविता तोच असे समस्ता
जैसा ठेवी तैसा रही हाचि धर्म
अनन्यत्व हे जाणिज भक्तीवर्म ॥ ५१ ॥

मना ! ईश्वराचा जीव हा अंश आहे
जसा सूर्य आणि किरण एक आहे
प्रभू विन कैसे जगू हेच मर्म
अनन्यत्व हे जाणिजे भक्तिवर्म ॥ ५२ ॥

कुणी मागती दान देवालयार्थ
अरे! राहतो का देव देवालयात
परी देश काळाचा विचार करावे
मना दान सत्पात्र बघुनि करावे ॥ ५७ ॥

नको दान देऊ रिपु नाशनार्थं
नको पाप घेऊ दृष्टाग्रहार्थं
नये हीत होता न ऐसे करावे
मना दान सत्पात्र बघुनि करावे ॥ ५८ ॥

कुणी हिंडती घेऊनीं दानपावल्या
कुणी ठेवती मंदिरी दानपेट्या
कुणी सांगती दान क्षेत्री करावे
मना दान सत्पात्र बघुनि करावे । ५९ ॥

अरे! पुण्य होते जरी दान देता
अरे! स्वर्ग लाभे जरी दान देता
कुणी सांगती नाम तक्तीं चढ़ावे
मना दान सत्पात्र बघुनि करावे । ६० ॥

मना दान देता दीन होऊ नये रे
मना नम्रता लीनताही असो रे
नको वाच्यता न कुणा ऐकवावे
मना दान सत्पात्र बघुनी करावे ॥ ५३ ॥

दिले पाहिजे ही म्हणोनीच द्यावे
कुणी दान देती म्हणूनी न द्यावे
अपात्रांचे ते दान दोषार्ह आहे
मना दान सत्पात्र बघुनि करावे ॥ ५४ ॥

श्रद्धाविणें दान ते तामसी रे
अरे उच्च नीचा नको पाहसीं ते
मनोद्वेग वाणीवेग ते आवरावे
मना दान सत्पात्र बघुनि करावे ॥ ५५ ॥

फलांक्षा नको दान देई म्हणोनि
मना मान सम्मान होई म्हणोनि
परोपकारार्थं ते दान नोहे
मना दान सत्पात्र बघुनि करावे ॥ ५६ ॥

आपदगता जनतेप्रती दान द्यावे
तयांना न मिळता मधे माफ व्हावें
जयांना नको ते तया प्राप्त होते
मना दान सत्पात्र बघुनि करावे ॥ ६१ ॥

लुटे भक्त दामा धान्यभांडार सर्वा
पुढे काय होईल न केलीहीं पर्वा
नसे स्वार्थ चिंती तया देव पुरवे
मना दान सत्पात्र बघुनि करावे ॥ ६२ ॥

कुन्ती सुते कवच कुन्डल दान केली
शिवी नृपे स्वतन मांसही दान केली
ब्रह्मार्पण दान देता म्हणावे
मना दान सत्पात्र बघुनि करावें ॥ ६३ ॥

कशाला मना मृत्युचा शोक वाहे
अरे मृत्यू होता पुढे जन्म आहे
मना मृत्यु समयी तुझा भाव जैसा
म्हणें नाथ जैराम मिळे जन्म तैसा ॥ ६४ ॥

क्षणोक्षणाला मृत्युचा शोध घेई
तदा जिवनाचा तुला बोध होई
मना बोध तो अमृतावाणी जैसा
म्हणें नाथ जैराम मिळे जन्म तैसा ॥ ६५ ॥

जगावें कसे रे मरोनी जगावें
अहंकार मारोनी जगतीं उरावें
असे ज्या प्रभूचे नाम श्वासोच्छवासा
म्हणें नाथ जैराम मिळे जन्म तैसा ॥ ६६ ॥

करी रे मना कर्म कल्याणकारी
परोपकारी जन हीतकारीं
लोकोद्धरार्थ ठेविशी भाव जैसा
म्हणें नाथ जैराम मिळे जन्म तैसा ॥ ६७ ॥

मना दान सत्कर्म ने सद्गतीस
पुढे जन्म धनी योगीयांचे घरात
श्रवण मनन योगे निदिध्यास जैसा
म्हणें नाथ जैराम मिळे जन्म तैसा ॥ ६८ ॥

किती योगयोगे व्रते दान करिशी
किती तिर्थयात्रा किती धाम पाहशीं
परी तोषविता व्यथा ना सुठेना
म्हणें नाथ जैराम ब्रम्हरेखां मिटेना ॥ ६९ ॥

किती बांधशी वीहीरी पाणपोया
कितीं अन्नछत्रे घालिसी ठायीठाया
परी अंतरीचा भोग काही सुटेना
म्हणें नाथ जैराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७० ॥

महारुद्र अभिषेक कित्येक केले
किती ब्राम्हणा दक्षिणा दान दिधले
आ शर्वचे दुर्दशा कां टळेना
म्हणें नाथ जैराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७१ ॥

अरे कोण देवे दैव निर्माण केले
परी देव ते दैव आधीन झाले
मना कार्यफल सोडिता सोडवेना
म्हणें नाथ जैराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७२ ॥

असो संत साधू वा ज्ञानी अडाणी
असो रंक राजा देव देवी भवानी

प्रारब्ध गतीभोग कुणा आकळेना
म्हणें नाथ जैंराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७३ ॥

नसे ठाव जिवा कर्मगतीचे विधान
जयाचेनी होते संचिताचे निदान
मना संचिताचा भोग कोणा सुटेना
म्हणें नाथ जैंराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७४ ॥

मना भोग प्रारब्ध आम्हीच केले
जसे कर्म अमुचे तसे प्राप्त झाले
नको दोष देऊ देवी देवादिकांना
म्हणें नाथ जैराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७५ ॥

मना कर्मयोगे तुझा जन्म झाला
विधीलेख ब्रम्हाने तेव्हाचीं लिहिला
मिटे रेख कसी करे यत्न नाना
म्हणें नाथ जैंराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७६ ॥

मना श्रीहरीं भोग वृंदेसी घेता
हरीं रावणें जानकी बाह्य येता
नसे भ्रांत रामा कर्मगतींच्या लिखाना
म्हणें नाथ जैंराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७७ ॥

तुझे कर्मफल हा तुझा भोग आहे
अरे भोग तो भोगूनी पार व्हावे
सहीं सुखदु:खचे सोसिता सोसवेना
म्हणें नाथ जैराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७८ ॥

मना सांगतो एक अति गुह्य गोष्ट
अरे शरण जाता संत सांगेल इष्ट
टळे आत्मज्ञाने परीं संतविना
म्हणें नाथ जैराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ७९ ॥

ब्रम्हामुळें कर्म निर्मित होते
कर्मामुळें यज्ञ पर्जन्य येंते
पर्जन्य होता जगी होई धान्य
म्हणें नाथ जैंराम जाणिजें अन्नब्रम्ह । ८० ॥

नसे अन्न कोणा कसे रे जगावे
नसे त्राण अंगी यज्ञ कैसे करावे
सतकर्म सदभाव सत हेंचि कर्म
म्हणों नाथ जैंराम जाणिजें अन्नब्रम्ह ॥ ८१ ॥

अरे तोचि वर्षा वर्षवितो वरोनि
वना पोसीतो चंद्रमा पाझरोनी

मना ज्ञान देतो जानसीं अन्नमर्म
म्हणें नाथ जैराम जाणिजें अन्नब्रम्ह ॥ ८२ ॥

मना अन्नयोगें निर्मिले जीवप्राणी
अभिमानी मानी अडाणीं सुजाणी
जसे खाती अन्न तसे होई कर्म
म्हणें दास जैराम जाणिजें अन्नब्रम्ह ॥ ८३ ॥

दिले अन्न ज्याने पोट संरक्षणार्थं
जठराग्नीलाही करीतो प्रदीप्त
तया शांतविण्या करिशी स्वधर्म
म्हणें दास जैराम जाणिजे अन्नब्रम्ह ॥ ८४ ॥

एकादशी ही तिथीं पुण्यदायी
असो वास मुळाचा प्रभूच्याच ठायीं
अहोरात्र प्रभूचे गुणगाण गावा
म्हणें नाथ जैराम उपवास करावा ॥ ८५ ॥

उपवास निमित्तें फलहार करती
कुणी गोड खाती चवीला न त्यजिती
दशेंद्रियांना दृढ़ आवरावा
म्हणें नाथ जैराम उपवास करावा ॥ ८६ ॥

एकादशीचे पारणें सोडी जेव्हा
दुर्वास छळी अंबरीशास तेव्हा
प्रभुवास उपवास हृदयी असावा
म्हण नाथ जैराम उपवास करावा ॥ ८७ ।

उपवास योगे उपासना ही
मना वासना सर्वंवाही त्यजावी
अगा वासनेचा मळ तो धुवावा
म्हणे नाथ जैराम उपवास करावा ॥ ८८ ॥

तारांगणा अप्सरा रोज केली
किती सूंदरा कामुका भोगियेली
परी भक्तीरंगात जी दंग आहे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ ८९ ॥

कितीं मिळवी धन कोट्यानुकोटी
परी साथ ना ये अंतकाळी लंगोटी
मना श्रीहरीचे नामधन साथ राहे
म्हणे नाथ जैराम सुखी तोचि आहें ॥ ९० ॥

मना शिकशी विश्व विद्यालयात
किती एक डिग्री मिळवी जिवनात

आत्मानुभवाची जया डिग्री आहे
म्हणे नाथ जैराम सुखीं तोचि आहे ॥ ९१ ॥

किती बांधिले धाम बंगले निवास
कितीं काळ केला तिथे तू निवास
परधाम जाता पुनः जन्म नोहे
म्हणें नाथ जैराम सुखीं तोचि आहे ॥ ९२ ॥

किती भुषविशी अपुल्या पदाला
अरे मान सम्मान लाभे जिवाला
परम पदाससम ते सौख्य नोहे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ ९३ ॥

किती जिंकले रथी महारथीला
सेनापतीची करी उध्वस्त सेना
सैन्य विषयांचे जो जिंकीताहे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ ९४ ॥

अगा वासना वाटती सुखकारी
नये तृप्त होता, होती त्या दुःखकारी
अगा वासनेचे जो बींज भाजताहे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ ९५ ॥

जयाने मना इंद्रिये जिकीयेली
जयाने मना विषये सांवरीली
मना ! विषय भोगा जो नित्य त्यागे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ ९६ ॥

जया क्रोध नाहीं जया लोभ नाही
जया काम नाही जमा मोह नाही
मना षडविकारे विचलीत नोहे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ ९७ ॥

मना वासनांचे बीज जेव्हा जळाले
मना कामनाचे भूत जेव्हा पळाले
जयाचे मना अंतरीं शांती आहे
म्हणे नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ ९८ ॥

अगा ध्यान ज्याने सोडिले विषयांचे
अगा ध्यान ज्याने जोडिले ईश्वराचे
मना सूक्ष्मसुक्ष्मी ईश्वराशीच पाहे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहें ॥ ९९ ॥

दुःखाचे कितीही गिरी आड आले
मना धैर्य ज्याचे कदापि न खचले
दुःखामध्ये जो सुख मानता हे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ १०० ॥

मना दुःख येई जाईल निघोनी,
तया मागुती सुख येईल भरोनीं
दुःखा सुखाच्या लपंडाव पाहे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ १०१ ॥

धरीं रे मना संग तो सज्जनांचा .
नको रे धरू संग तो दुर्जनांचा
जयाला मिळे संत संग सुदैवे
म्हणे नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ १०२ ॥

मना सच्चिदानंद घन वासुदेवा
अनन्य प्रेमे नित निरंतर भजावा
असे भाग्य बहुमोल तयाशीच लाभे
म्हणे नाथ जैराम सूखी तोचि आहे ॥ २०३ ॥

मना ईश्वराचे विस्मरण पडेना
तया सारिखा सुखी कोणी दिसेना
भजन किर्तने गुणगायन करावे
म्हणे नाथ जैराम सुखी तोची आहे ॥ १०४ ॥

अनन्यत्व भावे शरण ईश्वराला
प्रसादे परम शांती पावे जिवाला
मना ईश्वराच्या तु सन्निध आहे
म्हणें नाथ जैराम सुखी तोचि आहे ॥ १०५ ॥

अगा माधवा केशवा वासुदेवा
रमा वल्लभा बाळकृष्णा मुकुंदा
अगा लाज राखी ऐकूनी भक्त टाहो
म्हणें नाथ जैराम मुखी राम राहो ॥ १०६ ।

योगेश्वरा श्रीधरा हीतकारा
विश्वेश्वरा विश्वनाथ उदारा
तुझे गुण गाता जरी प्राण जावो
म्हणें नाथ जैराम मुखी राम राहो १०७ ।

तुझ्या वाणीने बोलतो बोलताहे
तुझ्या चक्षूने पाहतो पाहताहे
कृपेने तुझ्या मी कृपापात्र होवो
म्हणें नाथ जैराम मुखी राम राहो ॥ १०८ ॥

मनाला किती सांवरी सावरेना
मनाला किती आवरी आवरेना
मना श्रीहरीचा निदिध्यास लागो
म्हणें नाथ जैराम मुखीं राम राहो ॥ १०९ ॥

किती काळ गेला मना जिवनाचा
परी बोध नाही जगज्जीवनाचा
नये साधता साधने साधताहे
म्हणें नाथ जैराम मुखी राम राहो ॥ ११० ॥

श्रीरामशर लागता पापीयाशी
जड प्रेम त्याचे रघूच्या पदाशी
मिळे मुक्ती मरता देऊनी राम टाहो
म्हणें नाथ जैराम मुखी राम राहो ॥ १११ ॥

धनलक्ष्मीने पुर्ण न्हाऊनी निघता
दु:खा नलाने होरपळूनीं जाता
आशा निराशा घेरती सर्व बाहो
म्हणें नाथ जैराम मुखी राम राहो ॥ ११२ ॥

राजेंधिराजेंहीं आले नी गेले
किती संत साधु तेर्हा न सुटले
किती योगी राजे समाधिस्थ होती
मना मृत्युपासूनी कोणी न सुटती ॥ ११३ ॥

किती पाठ करींती मृत्यूंजयाचा
किती पाठ लाविती भागवताचा
अशाने की मृत्यू टळणार नोहे
जया जन्म आहे तया मृत्यू आहे ॥ ११४ ॥

नकोरे मना घाबरु मृत्युदेवा
अरे मृत्यु समयी ठेवी साक्षीभावा
असे जीर्ण वस्त्रास सोडूनी द्यावे
मना होशपूर्वक शरीरा त्यजावे ॥ ११५ ॥

कितीं ईच्छिती मृत्यु वाराणशीत
किती ईच्चिती मृत्यु समरांगणात
अगा मृत्यू येवो मूखीं नाम घेता
मना मृत्युचि जाणिजे ही प्रभूता ॥ ११३ ॥

वहुलीन व्हावे जगीं तारण्यासी
दया अंतरीं ठेंवी सर्व जिवासी
तनु त्यागिता किर्ती मागे रहावी
म्हणें नाथ जैराम सद्बुद्धी असावी ॥ ११७ ॥

सुविचाराचे आचार सदाचाराचे
मना प्रेंम ठेवी तू सेवाभावाचे
कधींही न बोलावें असत्य वाचे
म्हणें नाथ जैराम करी कर्म मानवाचे ॥ ११८ ॥

कुणी सांगताती पीडा हीं ग्रहाची
करा शांती ही प्रार्थना आग्रहाची
लुटोनी धना शांती काही मिळेना
म्हणें नाथ जैराम ब्रम्हरेखा मिटेना ॥ ११९ ॥

तुझा जन्म होता किती लोक जमती
मना यौवनी कामिनी झोंबतातीं
परी शेवटी येईना गोत प्रबळ
म्हणें नाथ जैराम साधिजें अंतकाळ ॥ १२० ॥

तुला काय ठावें तुझा अंतकाळ
अगा कुंडली पत्रिका सर्व खेळ
नसे ज्योतिषा ठाव त्याचींच वेळ
म्हणें नाथ जैराम साधिजे अंतकाळ ॥ १२१ ॥

कशाला म्हणावे अंतकाळास बापा
तुझ्या अंतरी सांगतो मार्ग सोपा
अरे श्वास घेता सोडता लागी वेळ
म्हणें नाथ जैराम साधिजे अंतकाळ ॥ ५२२ ॥

करीं अंतकाळीं स्मरण ज्या देवतेचे
मना पावशी स्थान त्या देवतेचे
संवय इंद्रियांना लाविशी हीच वेळ
म्हणें नाथ जैराम साधिजे अंतकाळ ॥ १२३ ॥

अनित्यामध्ये नित्य नेहमीं पाहावा
विनाशीं मधे अविनाशी जपावा
क्षरामधे अक्षर जो लोकपाळ
म्हणें नाथ जैराम साधिजे अंतकाळ ॥ १२४ ॥

असे काम करता नाम घ्या श्रीहरींचे
हरी जो स्वयं दु:ख भवसागरींचे
कामामधे पाहसीं हरी सर्वकाळ
म्हणें नाथ जैराम साधिजे अंतकाळ ॥ १२५ ॥

प्रपंचा करुनि परमार्थं करीशीं
गृहस्थीं करुनि संन्वासीं राहसीं
अनाभक्तिमधे घालवी सर्व वेळ
म्हणें नाथ जैराम साधिजे अंतकाळ ॥ १२६ ॥

मी तू पणाचे वाहुं नकोस ओझे
कशाला करीशीं सर्व हे माझे माझे
अरे अंतकाळी फोडिशी की कपाळ
म्हणें नाथ जैराम साधिजें अंतकाळ ११७ ॥

मनाचीं गति थाबवीं योगमार्गे
भृकटीमध्यें प्राण स्थापित करावे
मुखाने उच्चारा ओम दीर्घकाळ
म्हणें नाथ जैराम साधिजें अंतकाळ ॥ १२८ ॥

ललाटामधे असे चैतन्यशक्ति
करा ध्यान तियेचे असे जीं प्रदीप्ति
ब्रम्हानुभावा घें तरी एकवेळ
म्हणें नाथ जैराम साधिजें अंतकाळ ॥ १२९ ॥

वदे ब्रम्हज्ञानावरी चार गप्पा
असे मिटला भेद कीं सांग बाप्पा
जसे बोलतो चालतो ना कधीही
म्हणें नाथ जैराम भ्रमणेंत राही ॥ १३० ॥

असे चित्तीं वृत्ती निष्कामनेची
सदा ठेंवी वृत्ती सद्भावनेची
अरे जानूनी घें कर्म आणि अकर्म
म्हणें नाथ जैराम कर्मंगति ही कठींण ॥ १३१ ॥

नसे सौख्य पुत्री धनद्रव्य राशी
स्वप्नांतला भात खाता उपाशीं
मायीक अन् क्षणीक हें असताती खेळ
म्हणें नाथ जैंराम खोविशी व्यर्थ वेळ ॥ १३२ ॥

हृदय कपाटीं असे आत्मज्ञान
अज्ञान ताला लाविले बंद करून
किल्ली तयाची गुरूपाणीं आहे
म्हणें नाथ जैंराम शरणी तू जाये ॥ १३३ ॥

स्वत:चे श्रमावर जीवन जगावे
जना सुख होईं कर्म तैंसे करावे
दु:खाचे मध्ये सुख मानीत जावे
म्हणे नाथ जैंराम परदु:ख घ्यावे ॥ १३४ ॥

जपी ना तपी ना मिळे शांति मुक्ती
तथा पाहिजे एकअनन्य भक्ती
पद शांतिची अन् सद्‌गतीचीही प्राप्ती
म्हणें नाथ जैंराम हें तुझे सर्व हाती ॥ १३५ ॥

मनासारखा ह्या जगीं मित्र नाही
तयासारखा ह्या जगी शत्रू नाही
जिवा नेई नर्का पाठवीं मोक्षधामी
म्हणें नाथ जैराम मनोराजस्वामी ॥ १३६ ॥

दुःखांचे मद्य सुखोत्पत्तीं होई
अशी प्रचींति सज्जना नित्य येई
तयांना जगी मानती देवविभूती
म्हणें नाथ जैराम करा संतभक्ती ॥ १३७ ॥

जगी रे मना तुझा कोण आहे
तुझ्या अंतरी तूंचि शोधूनि पाहे
जयाला म्हणावे अरे माझे माझे
म्हणें नाथ जैराम वाहशी पाप ओझे ॥ १३८ ॥

प्रभूनाम स्मरणी सतत राहावे
सुखशांतीचा भोग अपूर्व आहे
अंतर्मुखे स्मरण जोवरी होत नाही
म्हणें नाथ जैराम भ्रमणेंत राही ॥ १३९ ॥

होता जरी दैवे मुखीं राम राम
कळेना मुळी त्या प्रभूनाम मर्म
जगीं वास त्याचा करी तोचि काम
म्हणें नाथ जैराम तूंच तू आत्माराम ॥ १४० ॥

अरे संत अंत कुताहीं कळेना
गुरु शरण विण ते नसे आकळेना
अरे शरणता कशीं पत्करावीं
म्हणें नाथ जैराम गुरुबोध घेई ॥ १४१ ॥

दैवी शक्ति मुक्तिचा मार्ग दावी
मना आसुरी शक्तीने ऱ्हास होई
दैवी प्रकृति जगीं वंदय आहे
असुरी प्रकृति जगीं निंदय आहे ॥ १४२ ॥

विचारी पणें सज्जना शब्द द्यावा
तया वचन शब्द नित्य पाळित जावा
विकारीपणें शब्द विन्मुख नसावे
तरी होतसे संतकृपा स्वभावें ॥ १४३ ॥

संतकृदेला पात्र व्हावे कसे रे
सुशील नम्रता भाव अंगी असो रे
बहुलीन होऊनि चरण धरावे
स्वतः जीवना यथा उद्धरावे ॥ १४४ ॥

पटेना जरी आत्मज्ञानाची खूण
कसे काय म्हणतो जाहले आत्मज्ञान
परात्म्यावरी थोडी दया नसेना
म्हणे नाथ जैराम व्यर्थ आयुष्य जाना ॥ १४५ ॥

श्रीरामनामी मनी छंद राहो
विषय वासनेचा नको छंद लागो
मनोबुद्धि सोडूनि भजसी गोविंद
म्हणे नाथ जैराम पहा ब्रम्हानंद ॥ १४६ ॥

पोटपाणीं भराया हा जन्म नोहे
कोटीं माया कराया हा जन्म नोहे
संचितानुसार जें जे मिळावे
म्हणें नाथ जैराम समाधानी व्हावे ॥ १४७ ॥

प्रतिबिंब पाहशी मन आरशांत
मिटे रे तुझा संशय त्या क्षणात
निराकार, अदृश्य, व्यापक एक आहे
म्हणें नाथ जैंराम स्वत: तूच आहे ॥ १४७ ॥

वेदांती सिद्धांती अती अंतराहे
पुस्तकी ज्ञान ते अंधकारात राहे
मना शाश्वती वाटते ना कधीही
गुरूदेव देती आत्म्याची प्रचीति ॥ १४९ ॥

प्रविव्रतेचा पती हींच शोभा
भक्तास्तवे राहीं उभा विठोबा
अनन्यश्रद्धा ठेवूनी अंतरात
म्हणे नाथ जैंराम भजा श्रीराम ॥ १५० ॥

अरे धर्म आज्ञा पाळशी तू जसा रे
तुझ्या रक्षणा धर्म येई तसा रे
धर्म रक्षण सम दुजे नाहीं पुण्य
म्हणें नाथ जैंराम तोचि तो पुण्यवान ॥ १५१ ॥

पाषाण देवास कोंबडा कापतोसी
चैतन्य देवास विसरूनी जाशी
अरे निर्दया काय हे पाप करीशी
म्हणें नाथ जैराम चांडाळ द्रोशी ॥ १५२ ॥

जिवाचे जोवरी देहपणा सुटेना
जन्म मृत्यूचा फेर नाही चूकेना
जिवा शिवाची जोवरी भेट नाही
म्हणें नाथ जैराम तया मुक्ति नाही ॥ १५३ ॥

जसा साप सोडीं आपुली देह कात
तसा त्यामुळे त्या मिळें पूर्व रूप
जुने वस्त्र बदले जुना देह बदले
म्हणें नाथ जैराम आत्मतत्व निराळे ॥ १५४ ॥

सदा रामनामाचा उच्चार करिती
तयांना न घडली कधीहीं प्रचीति
दया भाव ठेवा राम हा सर्व ठायी
म्हणें नाथ जैराम सोडिता नाम उपाधि ॥ १५५ ॥

तुझें ईहलोकी न कोणी हिताचे
असे कोण येथे तुझ्या रे मताचे
तूझे अंतकाळी कोण तो संग देई
म्हणें नाथ जैराम इथे सार नाहीं ॥ १५६ ॥

रावणनार्थ राम वनात गेले
सिता चोरिता ते रामायण जहाले
म्हणोनि श्रीराम पूजिती देव भावे
म्हणें नाथ जैराम धर्मकार्या व्हावे ॥ १५७ ॥

सत्कार्यं करता जरीं मृत्यू आला
अशा पुण्यकामी जींव सार्थक जहाला
असा देह त्यजता कीर्ति राहीं जनांत
म्हणें नाथ जैराम अमर होई जगांत ॥ १५८ ॥

अरे बोलूनीच पोट भरेल कैसे
अशा कागनी नर्क गिळेल कैसे
निरंकारतेने कर्म गळूनी जाती
म्हणें नाथ जैराम भाग्य फळाशीं येती ॥ १५९ ॥

सत्कर्म कराया सद्‌गुण आण अंगी
अरे निभवीं नाते मानवता संबंधी
सकळ जीवांचे हीत तूंही पाहसीं
म्हणें नाथ जैराम तुला देव समजसी ॥ १६० ॥

देहा परत्वे राम रावण ते समान
दैवासुरीं शक्ती असे असमान
पूजा होतसे राम देवा समान
आणि रावणा मानी असुरा समान ॥ १६१ ॥

अगा रावणें राम शोभून उठतो
भिक्षा निमित्ते जानकीं चोरिये तो
अगा पुण्यराशीं संपली घे म्हणून
म्हणें नाथ जैराम टाकले कुल मिटून ॥ १६२ ॥

मना संतसंगे पुण्य जो साधताहे
तयाच्या मूखातुन दया धर्म वाहे
जिवाच्या प्रति जिव्हाळा लोभ प्रेम
म्हमे नाथ जैराम भाग्य त्याचे उत्तम ॥ १६३ ॥



## किंमत– २-५०

भागवत प्रिटींग प्रेस, टी हाऊस, भिवापूर.